# शिक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग

१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.

ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com

दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७

वेब साईट- WWW.dydepune .com

---

जा.क्र. शिउसं/उमा-४०५/अ शे ता/मान्यता/पुवि/२०२४/ 11569

दिनांक : 10 OCT 2024

प्रति,

अध्यक्ष/ सचिव, दमानी एज्युकेशन फाउंडेशन, प्लॅट नं.१९३, ब्लॉक ३, जे.बी. मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई- ४०००२१

विषय : महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक, ६वी ते १२ वी सर्व शाखा इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई. संलग्नित नविन/दर्जावाढ शाळा सुरु करणेसाठी स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर निर्गमित शासन मान्यतेचे अनुषंगाने करावयाचे कार्यवाहीबाबत.

**दमानी एज्युकेशन फाउंडेशन, नरिमन पॉईंट, मुंबई संचलित सरस्वती विद्या ॲकॅडमी, गट नं.८३,८४,८५ व ८६, शिलाटणे, ता. मावळ, पुणे**

संदर्भ : १. श्री. सि.सा. घोरपडे, कार्यासन अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश जा.क्र. एसएफएस- १०२३/प्र.क्र ९१८/एसएम-२ दिनांक २७.०९.२०२४

२. प्राचार्य, सरस्वती विद्या ॲकॅडमी, मावळ, जि. पुणे यांचे पत्र दि.०३.१०.२०२४

उपरोक्त संदर्भीय आदेशाच्या अनुषंगाने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत दमानी एज्युकेशन फाउंडेशन, नरिमन पॉईंट, मुंबई संचलित सरस्वती विद्या ॲकॅडमी, गट नं.८३,८४,८५ व ८६, शिलाटणे, ता. मावळ, पुणे या उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक ( इ. ६वी ते इ. १२वी, सर्व शाखा इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.) स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर संदर्भीय क्र. १ चे शासन आदेशात अ.क्र. १ ते १२ अटी व शर्तीस अधिन राहून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नविन शाळा/ दर्जावाढ करण्यास मान्यता देण्यांत आलेली आहे.

सदर संदर्भीय क्र. १ चे शासन आदेशातील अ.क्र. १ ते १२ अटी व शर्ती आपल्या संस्थेस/ शाळेस बंधनकारक असून त्यानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहय्यित शाळा (स्थापना व बिनियमन) नियम २०२० मधील तरतुदीनुसार करण्यांत यावी.

(राजेंद्र अहिरे)
अध्यक्ष, क्षेत्रस्तरीय प्राधिकरण,
तथा शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

प्रत : माहितीस्तव रवाना
श्री. सि.सा. घोरपडे , कक्ष अधिकारी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२

प्रत : माहितीस्तव व कार्यवाहीस्तव रवाना
शिक्षणाधिकारी (माध्यमिक/ प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे/ अहमदनगर/ सोलापूर

शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग,
डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.

दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com
वेब साईट- WWW.dydepune .com

Order 1

००८

जा.क्र. शिउसं/प्राथ-२०४/ ज. रा. कु./२०२३-२०२४/ दिनांक : - 4 JAN 2024

प्रति,

सदस्य, क्षेत्रस्तरीय प्राधिकरण तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद पुणे
सदस्य सचिव,क्षेत्रस्तरीय प्राधिकरण, पुणे तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे

विषय : महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत दर्जावाढीने शाळा मान्यता मिळणेचे अनुषंगाने तपासणी करुन अहवाल सादर करणेबाबत Damani Education foundation, 7 th floor Hoechst House Plot No 193 Block III J B Marg Nariman Point Mumbai south 400021 संचलित सरस्वती विद्या अॅकेडमी/शिळाटणे ता मावळ पुणे ४१०४०५

संदर्भ : १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मुंबई कडील अधिसूचना दिनांक ५.१०.२०२०
२. कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय विस्तार दालन क्र.४३२ मुंबई यांचेकडील ऑनलाईन इरादापत्र क्रमांक एसएफएस-१०२३/प्र.क्र. ९१८/एसएम-२, दिनांक २०.११.२०२३
३. Damani Education foundation यांचेकडील पत्र दिनांक ४.१२.२०२३

उपरोक्त विषयाबाबत Damani Education foundation, 7 th floor Hoechst House Plot No 193 Block III J B Marg Nariman Point Mumbai south 400021 संचलित सरस्वती विद्या अॅकेडमी/शिळाटणे ता मावळ पुणे ४१०४०५ या इंग्रजी माध्यम सीबीएसई संलग्नित इ. ६ वी ते १२ वी उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक शैक्षणिक वर्ष सन २०२३-२०२४ पासून नवीन शाळा सुरु करणेसाठी संदर्भीय क्र. २ मधील अटी क्रमांक १ ते ९ चे अधिन राहून संदर्भीय क्र. २ व्दारे शासनामार्फत इरादापत्र निर्गमित झालेले आहे.

महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा स्थापना व विनियमन नियम २०२० दिनांक ५.१०.२०२० मधील नियम क्रमांक ५ चे अनुषंगाने संदर्भीय क्र. २ च्या शासन इरादापत्रानुसार Damani Education foundation, 7 th floor Hoechst House Plot No 193 Block III J B Marg, Nariman Point Mumbai south 400021 या इंग्रजी माध्यम सीबीएसई संलग्नित इ. ६ वी ते इ.१२ वी उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक शैक्षणिक वर्ष सन २०२३-२०२४ पासून स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील नवीन शाळा सुरु करणेसाठी मान्यता मिळणेचे अनुषंगाने मा. आयुक्त ( शिक्षण ) पुणे यांचेकडील दिनांक ९.५.२०२२ रोजीची तपासणी सूची व दि.१४.५.२०२२ रोजीचे मा आयुक्त (शिक्षण) यांचेकडील आढावा बैठकीत प्राप्त सूचनानुसार तसेच मा.अध्यक्ष राज्यस्तरीय प्राधिकरण तथा मा आयुक्त (शिक्षण) यांचेकडील दि.२०.७.२०२२ चे पत्रातील मुद्दा क्र.१ते १२ चे अवलोकन करुन त्यानुसार प्रस्ताव आपले स्तरावरुन तपासणी करुन आपल्या स्वयंस्पष्ट शिफारशीसह व तपासणी सूचीवर आपल्या व सदस्य क्षेत्र प्राधिकरण तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद पुणे यांचे स्वाक्षरीसह क्षेत्र प्राधिकरण समिती सभेचे वेळी ३ प्रतीत सादर करावा.

(राजेंद्र अहिरे)
अध्यक्ष,क्षेत्रस्तरीय प्राधिकरण,तथा
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

प्रत : माहितीस्तव सविनय सादर
मा.सदस्य सचिव राज्यस्तर प्राधिकरण तथा मा सहसंचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे

**शिक्षण उपसंचालक कार्यालय- पुणे विभाग,**
१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com
वेब साईट- WWW.dydepune .com

३६२५

जा.क्र. शिउसं/प्राथ-२०४/ज.रा.कु./शाळा मा.प्र./२०२३-२०२४/ /दिनांक : 18 MAR 2024

प्रति,

मा. अध्यक्ष, राज्यस्तरीय प्राधिकरण, तथा मा. आयुक्त (शिक्षण) शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे -१.

विषय : महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नविन/ दर्जावाढ शाळा मान्यता पत्र मिळणेस्तव प्रस्ताव सादर करणेबाबत

नमूना एक क्षेत्र स्तरीय प्राधिकरणाचा अहवाल दमाणी एज्युकेशन फौंडेशन, ७ वा मजला, होचेस्ट हाऊस प्लॉट नं.१९३, ब्लॉक-३,जे बी. मार्ग, नरिमन पॉइंट मुंबई (दक्षिण) ४०००२१ संचलित सरस्वती विद्या ॲकडमी शिलाटणे गाव, ता.मावळ जि. पुणे-४१०४०५

संदर्भ : १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय,मुंबई-४०००३२ कडील अधिसूचना दिनांक ५.१०.२०२०

२.मा.आयुक्त (शिक्षण) शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील आदेश जा.क्र. आस्था/प्राथ- १०६/स्वयंअर्थ/२०२२/२६१७,दि.१.५.२०२२

३.मा. अध्यक्ष,राज्यस्तरीय प्राधिकरण तथा मा.आयुक्त (शिक्षण) शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील सभा दिनांक १४.५.२०२२

४.मा. अध्यक्ष,राज्यस्तरीय प्राधिकरण तथा मा.आयुक्त (शिक्षण) शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे तथा यांचेकडील आदेश जा.क्र. शि.सं.माध्य/स्वयंअर्थ/परिपत्रक/२०२२-२३/एस-४/४९७८, दि.२०.७.२०२२

५. कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मुंबई यांचेकडील आदेश जा क्र एसएफएस-१०२३/प्र क्र ११८/एसएम-२, दिनांक २०.११.२०२३

६श्री.अनंत दाणी, उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,पुणे यांचेकडील तपासणी अहवाल दि.१८.१.२०२४

७.क्षेत्र प्राधिकरण समिती सभा दिनांक २१.२.२०२४ नुसार अ.क्र. २१ व्दारे मान्य प्रस्ताव

८.या कार्यालयाचे जा क्र शिउसं/प्राथ-२०४/ज रा कु/मा प्र/२६३८/२०२३-२०२४, दिनांक २७.२.२०२४

९.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे यांचेकडील पत्र जा.क्र. माध्य/शिक्षण/स्वं अ शा./२२१८/२०२४, दि.५.३.२०२४

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत सादर करणेत येते की, सुधारित तपासणी सूचीनुसार प्रस्ताव सादर करावा यानुसार निर्देश मा. राज्यस्तरीय प्राधिकरणाकडून या कार्यालयास संदर्भीय क्र. २ नुसार प्राप्त झालेले होते. तदनंतर राज्यस्तरीय प्राधिकरणाकडील आढावा बैठकीत याबाबत निर्देश संदर्भीय क्र.३ द्वारे प्राप्त झाले होते. तदनंतर अ.क्र. १ ते १२ मुद्दयाव्दारे मा. राज्यस्तरीय प्राधिकरणामार्फत संदर्भीय क्र. ४ व्दारे सूचना प्राप्त झालेल्या होत्या.

तदनंतर दमाणी एज्युकेशन फौंडेशन, ७ वा मजला, होचेस्ट हाऊस प्लॉट नं.१९३, ब्लॉक-३,जे बी. मार्ग, नरिमन पॉइंट मुंबई (दक्षिण) ४०००२१ संचलित सरस्वती विद्या ॲकडमी शिलाटणे गाव, ता.मावळ जि. पुणे-४१०४०५ इंग्रजी माध्यम सीबीएसई संलग्नित इ.६ वी ते इ. १२ वी सर्व शाखा दर्जावाढ शाळेस शासनाकडून संदर्भीय क्र ५व्दारे इरादापत्र निर्गमित झालेले आहे.

तदनंतर संदर्भीय क्र ६ व्दारा श्री.अनंत दाणी, उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,पुणे यांचेकडील तपासणी अहवाल दि.१८.१.२०२४ रोजीचा प्रस्तावासोबत प्राप्त झालेला आहे. तदनंतर संदर्भीय क्रमांक ७ व्दारे सदर शाळेचा प्रस्ताव दिनांक २१.२.२०२४ चे क्षेत्र प्राधिकरण पुणे यांचेकडील सभेत मान्य झालेला आहे. तदनंतर क्षेत्र प्राधिकरणाचे दि २१.२.२०२४ रोजीचे सभेतील मान्य प्रस्ताव सदस्य सचिवांचे नस्तीतील प्रत्येक पानावर स्वाक्षरी करुन या कार्यालयास सादर करणेबाबत या कार्यालयाने संदर्भ क्र. ८ व्दारे शि.अ. (माध्यमिक) जिल्हा परिषद,पुणे यांना कळविले होते.

तदनंतर संदर्भीय क्र. ९ व्दारे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे यांचेकडून या कार्यालयास प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. तरी शासनाने निर्गमित केलेल्या इरादापत्रात नमूद असलेनुसार सन २०२३-२०२४ पासून खालील तपशीलानुसार या पत्रासोबत २ प्रतीत ऑफलाईन प्रस्ताव उक्त नविन शाळेस मान्यता मिळणेस्तव सादर करीत आहोत स्विकार व्हावा ही विनंती.

| अ क्र | संस्थेचे नांव | नविन/दर्जावाढ शाळेचे नांव व ठिकाण | मंडळ संलग्नता | शाळेचा प्रकार | माध्यम | शिफारस |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | दमाणी एज्युकेशन फौंडेशन, ७ वा मजला, होचेस्ट हाऊस प्लॉट न.१९३, ब्लॉक-३,जे बी. मार्ग, नरिमन पॉइंट मुंबई (दक्षिण) ४०००२१ | सरस्वती विद्या ॲकडमी शिलाटणे गाव, ता.मावळ जि. पुणे-४१०४०५ | सीबीएसई | दर्जावाढ इ ६ वी ते इ. १२ वी सर्व शाखा प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी | दर्जावाढ इ ६ वी ते इ. १२ वी सर्व शाखा प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर शिफारशीसह मान्यतेस्तव सादर |

आपला विश्वासू

(राजेंद्र अहिरे)
अध्यक्ष,क्षेत्रस्तरीय प्राधिकरण,तथा
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

लिपीक १९/०३/२०२४

आयुक्त शिक्षण यांचे कार्यालय
मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.

प्रत : माहितीस्तव सविनय सादर

मा. शिक्षण सहसंचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य पुणे तथा सदस्य सचिव,राज्यस्तरीय प्राधिकरण